ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# अभिरूचीचे मापन आणि शिक्षण

**नंदिनी पाटील**

टिळक शिक्षण महाविदयालय

**वैशाली शिंदे**

अध्यापक महाविदयालय अरण्येश्वर,पुणे-९

**Abstract**

**सारांश**

*आजची शिक्षण पद्धती ही विदयार्थी केंद्रित आहे.माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात विदयार्थ्या समोर व्यवसाय निवडीचे ,वेगवेगळया क्षेत्रात शिक्षण घेण्याचे क्षेत्र विस्तारलेले आहे.वैज्ञानिक शोधांचा परिणाम म्हणून,आपल्या गरजांच्या प्रणेतून विविध प्रकारचे व्यवसाय अस्तित्वात आले आहेत. रूचि -परीक्षण कसोटयांचा विकास,अभिरूची व्याख्या,अभिरूचीची वैशिष्टये, रूचीचे प्रकार,अभिव्यक्त रूची, प्रकट रूची, परीक्षित रूची, सूची समूह शोध रूची, रूचि - परीक्षणाचे प्रकार, प्रमुख परदेशी आणि भारतीय रूचि-परीक्षणे,*

*रूची मापन,रूची आणि भावना, रूची आणि इच्छा, रूची आणि अभिवृत्ती, रूची आणि अभिक्षमता,रूची आणि क्षमता, रूचीचा उद्गम, अभिरूची मापन साधने,अभिरूची मापनाची आवश्यकता, अभिरूची मापनाच्या मर्यादा,अभिरूची शोधिका, अभिरूची शोधिका - उपयुक्तता, मर्यादा ,अभिरूचीचे शैक्षणिक महत्त्व, यशाचा अनुभव ,विदयार्थ्यांच्या गरजा,अध्यापन सूत्रांचा नावीन्यपूर्ण शैक्षणिक साधनांचा उपयोग करावा,शिक्षकाचा दृष्टीकोन ,अवधान आणि अभिरूची, अवधान आणि अभिरूची यांचा संबंध, अभिरूची चाचण्यांचा वापर करून केलेले संशोधन इ. घटकांची माहिती यामध्ये दिलेली आहे.विदयार्थ्यांच्या अभिरूचीनुसार शिक्षण दिले गेले तर विदयार्थ्यांचा विकास योग्य मार्गाने होवून त्यांच्यातील आत्मविश्वास वाढेल. वेगवेगळया क्षेत्रात विदयार्थी प्रावीण्य मिळवतील. विदयार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासाबरोबर देशाचा आर्थिक, सामाजिक विकास ही होईल. वेगवेगळया अभिरूचीच्या चाचण्यांचा उपयोग करून विदयार्थ्यांचे मापन केले असता विदयार्थ्यांची आवड कोणत्या क्षेत्रात आहे.हे लक्षात घेवून विदयार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देता येईल. देशातील शिक्षणप्रकिया विदयार्थ्यांच्या अभिरूचीनुसार चालणारी असेल तर विदयार्थ्यांबरोबर देशाचा विकास ही निश्चितच होईल.*

पस्तावना

आजची शिक्षण पद्धती ही विदयार्थी केंद्रित आहे.माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात विदयार्थ्या समोर व्यवसाय निवडीचे ,वेगवेगळया क्षेत्रात शिक्षण घेण्याचे क्षेत्र विस्तारलेले आहे.वैज्ञानिक शोधांचा परिणाम म्हणून,आपल्या गरजांच्या प्रणेतून विविध प्रकारचे व्यवसाय अस्तित्वात आले आहेत.

पदार्थ विज्ञान ,रसायनशास्त्र,जीवशास्त्र, यांच्या विविध उपशाखां बरोबर जैवतंत्रज्ञान ,संगणक शास्त्र, नॅनो टेक्नॉलॉजी ,वैदयकशास्त्र,अवकाशशास्त्र यामध्ये क्रांतिकारक शोध लागत आहेत व त्यातून विदयार्थ्यांसाठी शिक्षणाची नवीन दालने खुली होत आहेत.कला शाखेतून नेहमीची सामाजिक शास्त्रे यांबरोबर देशी व परदेशी भाषांची मागणी वाढत आहे.ॲनिमेशनचे नवे तंत्रज्ञान एका नव्याच क्षेत्राची संधी

उपलब्ध करुन देत आहे. अवकाशातील अभ्यासक्रमाचे क्षेत्र विस्तारत आहे.सध्याचे विदयार्थी या अर्थाने सुदैवी आहेत की ,त्यांच्या समोर शिक्षणासाठी , व्यवसायासाठी

विविध मार्ग उपलब्ध आहेत. पण हीच गोष्ट निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्यांना गोंधळात टाकणारी आहे.ही परिस्थिती बदलण्यासाठी व विदयार्थ्याच्या शिक्षणाला, योग्य व्यवसाय निवडीच्या क्षेत्राला निश्चित दिशा देण्यासाठी उपलब्ध आहेत अभिरूची शोधिका.

**रूचि -परीक्षण कसोटयांचा विकास**

## (Development of Interest Tests In India And Abroad)

सर्व प्रथम अमेरिकेत व्यावसायिक आणि शैक्षणिक मार्गदर्शन करण्याच्या गरजेतून रूचिपरीक्षणाचा जन्म झाला.त्यामुळे शिक्षण, उदयोगधंदे यातून रूचिपरिक्षण हे आवश्यक प्रेरक असे मानसशास्त्रीय परीक्षण समजले जाऊ लागले.तिच्या मापनाचे वस्तुनिष्ठ आणि व्यक्तिनिष्ठ असे दोन प्रकार पडतात. रूचि-परीक्षणामुळे व्यक्तिला कोणत्या कामात रस आहे हे कळते व ते काम शिक्षण त्याला देता येते.त्यामुळे काम अधिक मन:पूर्वक केले जाते.कामाचा दर्जा सुधारतो.या दृष्टीकोनातून रूचि-परीक्षणाचा जाणीवपूर्वक विकास केला गेला. म्हणून रूचि मापनाचा इतिहास फार जुना नाही.व्यावसायिक क्षेत्रात आणि शैक्षणिक क्षेत्रात योग्य व्यक्तिंची निवड करण्यासाठी रूचिपरिक्षण कसोटी सर्वप्रथम १९१४ मध्ये “कार्नेजी इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी” इथे तयार केली गेली.या क्षेत्रात पध्दतशीर अभ्यास सुरू करण्याचे श्रेय ‘व्यावसायिक प्रवृत्ती सूची’ तयार करणा-या मायनर १९१८ याला जाते.तिच्याव्दारे व्यक्तिची विशिष्ट रूची आणि पात्रता निश्चित करणे सोपे झाले.त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात अशा परीक्षण कसोटयांचा व्यापक प्रमाणात उपयोग होऊ लागला त्यानंतर मात्र विविध क्षेत्रांसाठी व्यक्तिचे रूचि मापन करणाया विविध कसोटया तयार होऊ लागल्या. त्यात दहा - बारा प्रश्नांपासून २००-२०० प्रश्नसंख्या असलेल्या कसोटया होत्या.हर्वाट, व्हेलर, प्रिस्ले, कूडर, ली थॉर्प, गिलफर्ड, स्नाईडमन, झिमरमन, थर्स्टन इ.चा अनेक विषयांसाठी तयार केलेल्या रूचि-परीक्षण कसोटया प्रसिध्द आहेत.

भारतीय रूचि मापन परीक्षण क्षेत्रात मुख्यत: पाश्चात कसोटयांचे भारतीय वातावरण व गरजांनुसार अनुकूलनाचे कार्य जास्त प्रमाणात झाले.यातील काही अनुकूलन कार्यपुढीलप्रमाणे आहेत.

- **आलाहाबाद ब्युरो ऑफ व्होकेशनल अँड एज्युकेशनल गाईडन्स :** १९५६ कूडर इन्व्हेंटरीचे अनुकूलन.यात ८० प्रश्न असून प्रत्येक प्रश्नासमोर १,२,0 असे आकडे असतात.सगळयात जास्त आवडीच्या प्रश्नासमोर २ वर खूण केली जाईल तर नावडीच्या प्रश्नासमोर 0 वर खूण केली जाईल.
- **एस.चटर्जी (१९६0) :** एक मान्य इन्व्हेंटरी भारतीय वातावरणाला अनुरूप अशी दहा विविध क्षेत्रांसाठी तयार केलेल्या इन्व्हेंटरीज तयार केल्या.
- **एस.बी.लाल भारव्दाज (१९६0) :** व्यावसायिक शिक्षणासाठी परीक्षण कसोटया तयार केल्या.
- **रामशकल पाण्डेय (१९६५) :** कुमारवयीन मुलांच्या रूचि-परीक्षणासाठी कसोटया तयार केल्या.
- **रघुराज पाल सिंह (१९६७) :** यंत्रज्ञान, व्यापार, विज्ञान, सौंदर्य, सामाजिकता कारकून इ.च्या रूचि मापनासाठी
- **मीरा जोशी, जगदीश पाण्डे :** व्यावसायिक, प्राथमिकता, रूचि मापन तसेच साहित्य, विज्ञान, सर्ज

नशीलता, सौंदर्य, शेतकी , समाजसेवा इ. अनेक क्षेत्रांतील रूचि-मापनासाठी अनेक परीक्षण कसोटया तयार झाल्या आहेत. (फाटक मा. १९९९,१३४)

**अभिरूची व्याख्या :**

- अवधान म्हणजे अभिरूचीच्या वोधनात्मक प्रक्रियेची निश्चिती. Bingham W.V.
  (गुळवणी मे.,२००९,१४५)

" एखादया अनुभवात स्वत:ला गुंतवून ठेवण्याची तो अनुभव दीर्घकाळ ठेवण्याची प्रवृत्ती अभिरूची होय." - विंगॅम डव्यू.व्ही.
(गुळवणी मे.,२००९,१४५)

" अभिरूची ही भिन्न मानसशास्त्रीय वाव नसून वर्तनाच्या अनेक अंगापैकी एक अंग आहे. - सुपर डी.ई. (गुळवणी मे.,२००९,१४६)

" विशिष्ट वस्तू वा प्रसंगाच्या वावतीत प्रत्यक्ष किंवा काल्पनिक प्रतिक्रियांशी संवंध आवडण्याची भावना म्हणजे अभिरूची होय." - जोन्स
(गुळवणी मे.,२००९,१४६)

"अभिरूची म्हणजे सुप्त अवधान आणि अवधान म्हणजे व्यक्त अभिरूची." - मॅकडुगल (गाजरे रा.वि.,चिटणीस अ.२००६,१७७)

**अभिरूवीची वैशिष्टये -**

- अभिरूचीचा विकास परिस्थिती व अनुवंश यांच्या सहयोगातून येतो.
  परंतु अभिरूची मुख्यत्वे संपादित केल्या जातात.
- अभिरूचीमुळे कृती करण्यास प्रेरणा मिळते.
- अभिरूची हया व्यक्तिमत्वाचाच एक भाग असतो
- अभिरूचीमुळे कोणतेही काम किंवा कृतीचे ओझे वाटत नाही.
- अभिवृत्ती खूपशा स्थिर असतात.सहजासहजी त्यात वदल करता येत नाही.
- सर्वसाधारणपणे अभिरूची व क्षमता यांचा सहयोग आढळतो. (गुळवणी मे.,२००९,१४६)

**रूचीचे प्रकार :**

रूचीचे प्रकट दर्शन कशाकशातून होते.यावरून रूचीचे चार प्रकार मानले जातात.

- **अभिव्यक्त रूची :**
  प्रश्नांमधून विचारांच्या अभिव्यक्तिमधून एखादी वस्तू क्रिया किंवा व्यक्ति यांच्यावद्दल प्रकट होणारी रूची ही अभिव्यक्त रूची असते.
- **प्रकट रूची :**
  एखादी कला, कौशल्याची वाव नवा विषय खेळ वगैरे शिकणे यातून त्या व्यक्तिला त्यावद्दल असलेल्या रूचीचे प्रकटीकरण होते.
- **परीक्षित रूची :**

जेव्हा एखादया व्यक्तिल परीक्षेत एखादया विषयात इतर विषयांच्या तुलनेत खूप गुण मिळालेले दिसतात. तेव्हा त्या विषयात तिला जास्त रूची आहे. असे आपण समजतो.

- **सूची समूह शोध रूची :**

जेव्हा प्रमाणित रूची कसोटयांव्दारे एखादयाच्या रूचीचे ज्ञान केले अथवा करवले जाते व व्यक्तिला मार्गदर्शन करण्यासाठी त्या सुचीचा उपयोग केला जातो. तेव्हा तिला सूची-समूह-
शोध-रूची असे म्हणतात. (फाटक मा.१९९९,१३२)

- **रूचि - परीक्षणाचे प्रकार :**

ही परीक्षणे सर्वसाधारपणे दोन प्रकारची असतात.

  - व्यावसायिक ( Vocational Interest Tests ) रूचि परिक्षणे
  - सर्वसाधारण, अव्यावसायिक (Non- Vocational Interest Tests or General Interest Tests )

या व्यावसायिक क्षेत्रात अनेक त-हेने रूचींचे अस्तित्व आणि मापन करण्याची अनेक परीक्षणे तयार झाली आहेत व ती विश्वसनीय पण आहेत.

सामान्य अव्यावसायिक परीक्षणांची संख्या भरपूर आहे. यांची रचना, सोपी, सुस्पष्ट असते. पडताळा सूची प्रश्नावली लेखन इ. त-हेचे प्रश्न पण यात असतात. प्रत्येक ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीला अनुलक्षून अशा प्रश्नमालिका यात तयार केलेल्या असतात. मार्गदर्शन आणि सल्ला यांसाठी ही परीक्षणे उपयुक्त ठरतात.

**प्रमुख परदेशी आणि भारतीय रूचि-परीक्षणे :**

**परदेशी रूचि परीक्षण**

- स्ट्राँगची व्यावसायिक रूचि (Strong's Vocational Interest Inventory )
- कूडर रूचि प्राथमिकता पडताळा
- थर्स्टनची रूचि पडताळा सूची

**भारतीय रूचि परीक्षण**

- एस. चटर्जी अभाषिक प्राथमिकता प्रपत्र ( CNPR – FORM 962 )
- आर. पी. सिंग रूचि प्रपत्र
- एस. पी. कुलश्रेष्ठ व्यावसायिक रूचि -परीक्षण
- एस. पी. कुलश्रेष्ठ शैक्षणिक रूचि -परीक्षण
- डी. एस. सोढी आणि भटनागर रूचि -परीक्षण
- एम. एन. पलसाने आणि साधना शर्मा स्वयं अध्ययन सवय परीक्षण

(फाटक मा., १९९९, १३६)

**रूची मापन :**

रूची म्हणजे एखादया विषयात असलेला रस या कल्पनेची इच्छा,अभिवृत्ती, अभिक्षमता इ.गोष्टींशी तुलना करता त्यात खूप अंतर आहे फरक आहे असे आपणास आढळून येईल.

**१. रूची आणि भावना :**

यातील फरक पहिला तर रूचीत फक्त सुख आनंदाची अनुभूती येते तर भावनेत या व्यतिरिक्त इतर सर्व भावनांची म्हणजे दु:ख, क्रोध, उद्वेग इ.वेगवेगळया प्रसंगाने अनुभूती येत असते.

**२. रूची आणि इच्छा :**

रूची म्हणजे एखादया अनुभवानंतर तो आनंदकारक वाटून त्यात रस वाटू लागतो.ही क्रिया सकारात्मक असते पण वस्तूच्या अभावातून इच्छा जागृत होते व ती वस्तू अनुभव मिळवण्याचा प्रयत्न सुरू होतो.

**३. रूची आणि अभिवृत्ती :**

सर्वसाधारणपणे या दोन्हीत खूप जवळचा संबंध असतो.तरीपण काही वेळा त्यांच्यात परस्परविरोध असतो.अभिवृत्तीत धनात्मक आणि ऋणात्मक दोन्ही विचारांना महत्व असते तर रूचीत फक्त धनात्मक विचारच असतात.तसेच संपूर्ण जीवनभराच्या अनुभवातून अभिवृत्तीही निर्माण होत असते.तर रूचीचा संबंध शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रांशी व त्यांच्या निवडीशी असतो.

**४. रूची आणि अभिक्षमता :**

रूची आणि अभिक्षमता या दोघांचा एकमेकांशी अतिशय घनिष्ट सहसंबंध आहे आणि एकमेकींच्या विकासाला त्या साहयभूत होत असतात.

सूपर (Super) च्या विचारानुसार जेव्हा जन्मजात अभिक्षमता आणि सामाजिक सोयी सुविधा यांच्यात देवाणघेवाण सुरू होते, तेव्हाच रूची जागृत होते.म्हणून रूची विकासासाठी अभिक्षमतेची आवश्यकता आहे याउलट एखादया विषयात रूची विकासासाठी अभिक्षमतेची आवश्यकता आहे.याउलट एखादया विषयात रूची नसेल तर त्याबाबतच्या व्यवसायाची आपण कल्पना पण करू शकत नाही.म्हणूनच एखादयाची अभिक्षमता (Attitude) ठरवण्यासाठी त्याची रूची, कल कशात आहे हे पाहावे लागते. व्यक्तिच्या ठिकाणी या दोन्ही गोष्टी असतील तर ती त्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करेल, मनापासून शिकेल.

**५. रूची आणि क्षमता :**

या दोन्ही गुणांतही एक विशिष्ट संबंध दिसून येतो.एखादी विशिष्ट गोष्ट शिकण्यासाठी व्यक्तित त्या गोष्टीबद्दल आवड आणि ती शिकण्याची क्षमता दोन्ही असावे लागते. केवळ एकाच गोष्टीच्या असण्याने अध्ययनाला मदत होत नाही.चित्रे काढण्याची आवड आहे पण ती क्षमता नसेल तर व्यक्ती उत्तम चित्रकार बनू शकणार नाही.हीच गोष्ट इतर बाबतीतही लागू आहे.

**६. रूचीचा उद्गम -**

रूची म्हणजे आवडीचा उद्गम कशातून होतो.तिचे मूळ नेमके कशात आहे.हे सांगणे कठीण आहे.तिच्या निर्मितीत परिस्थिती आणि संशय दोन्ही घटक कारणीभूत असतात. तसेच सुखसोयी आणि सामाजिक मूल्यमापन हे पण तिच्या विकासात कारणीभूत ठरत असते.प्रथम अभिक्षमता आणि रूची म्हणून केलेल्या एखादया गोष्टीचा समाजात उद्रेक झाला की ती रूची आणखी झपाटयाने वाढीस लागते.

जसे चित्रकारी कौशल्यपूर्ण वा वेगळया वस्तू बनविणे, निर्मिती इ.म्हणून रूचीचा उद्‌गम आणि वाढ ही अभिक्षमते वरोवरच सामाजिक मान्यतेवर अवलंबून असते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.म्हणून ती काही प्रमाणात संपादित पण असते असे ही म्हणता येते.तसेच इच्छा, अभाव, आदर्श वातावरण, संस्कृती, सोयी, अनुभव रूचीच्या विकासात जसे सहायक ठरतात.परिवर्तन, प्रोत्साहन,यश हे पण साहयभूत ठरत असतात. रूचीत अभिक्षमताही बीजरूपात असतेच, तिचेच एक विधायक विशाल स्वरूप आहे.वय आणि लिंग भेदानुसारही रूचीचे स्वरूप वेगवेगळे असते. (फाटक मा.१९९९,१३२)

**अभिरूची मापन साधने :**

अभिरूची मापन करण्यासाठी निरीक्षण मुलाखत, पडताळासूची, प्रश्नावली,
शोधिका अशा अनेक पध्दतींचा व साधनांचा वापर केला जातो.प्रमुख शोधिका पुढीलप्रमाणे आहेत.

- स्ट्रॉंगची व्यावसायिक अभिरूची नमुनापत्रिका ह्यफेम्ह
- कुडरच्या प्राधान्य क्रम नोंदी
- क्लिटनची व्यावसायिक अभिरूची शोधिका

**अभिरूची मापनाची आवश्यकता :**

- व्यक्तिच्या सुप्त आवडीनिवडी उजेडात येतात.
- प्रत्यक्ष कृतीवरून अभिरूचीची पातळी व प्रमाण समजते.
- अभिरूची व क्षमता आणि अभिरूची व प्राविण्य यांची तुलना करता येते.
- मार्गदर्शकास विदयार्थ्यावावत व विदयार्थ्यास स्वत:बावत अभिरूचीचे ज्ञान होते.
- अभिरूचीनुसार व्यवसाय निवड करण्यास सहकार्य करता येते.
- योग्य कर्मचायांची निवड करण्यास उपयुक्त ठरते.
- व्यवसाय मार्गदर्शनासाठी उपयुक्त ठरते.
- व्यक्तिची अभिरूची तात्पुरती की खरी हे समजते. (गुळवणी मे.,२००९,१४६)

**अभिरूची मापनाच्या मर्यादा :**

- शालेय विदयार्थ्यांच्या अभिरूची स्थिर झालेल्या नसतात.त्या स्थिर होण्यापूर्वी त्यांचा शोध घेणे योग्य ठरत नाही.
- सुप्त अभिरूची कृतीत उतरविण्यासाठी अनुकूल परिस्थिती व वातावरण यांची आवश्यकता असते.असे वातावरण सर्वांनाच मिळते असे नाही.
- विविध व्यवसायात अनेक कृती असतात.त्यामुळे विशिष्ट अभिरूचीच्या आधारावर विशिष्ट व्यवसाय निवडणे योग्य ठरेलच असे नाही.

- कुमारावस्थेतील विदयार्थी स्वत:चा व जीवनाचा शोध घेत असतो. त्यांना स्वत:ला काय आवडते, काय पाहिजे याची जाणीव नसते. (गुळवणी मे.,२००९,१४६)

**अभिरूची शोधिका :**

व्यक्तिच्या जीवनात त्यांच्या अभिरूचींना आवडी निवडींना महत्वाचे स्थान असते. ज्या कामाची, छंदाची वा व्यवसायाची व्यक्तिस आवड असते ते काम, छंद वा व्यवसाय व्यक्ती मनापासून करते व त्यात स्वत:ला झोकुन देते. अभिरूची आणि प्रेरणा यांचा अगदी जवळचा संबंध असतो. व्यक्तिच्या व्यवसाय निवडीत अभिरूचीचा मोठा वाटा असतो. म्हणून मार्गदर्शक समुपदेशकास विदयार्थ्यांच्या अभिरूचींची माहिती असणे आवश्यक असते. ही माहिती वस्तुनिष्ठ रितीने मिळविण्याचे साधन म्हणजे प्रमाणित अभिरूची शोधिका होय.

**अभिरूची शोधिका - उपयुक्तता :**

अभिरूची शोधिका मार्गदर्शन व समुपदेशन कार्यात पुढील कारणांमुळे उपयुक्त असतात.

- व्यक्तिने दावा केलेली तात्पुरती अभिरूची काढणे.
- व्यक्तिच्या सुप्त आवडीनिवडी उजेडात येतात.
- प्रत्यक्ष कृतीवरून अभिरूचीची पातळी वा प्रमाण कळून येते.
- अभिरूची व क्षमता आणि अभिरूची व प्राविण्य यांची तुलना करता येते.
- अभिरूचीनुसार व्यवसायाची निवड करण्यास मदत होते
- मार्गदर्शकास विदयार्थ्याविषयी व विदयार्थ्यास स्वत: विषयी माहिती कळते.
- नोकरदात्यास योग्य कर्मचारी निवडण्यास ही माहीती उपयुक्त ठरते.
- व्यवसाय मार्गदर्शनाच्या कामी विदयार्थ्यांच्या अभिरूचींची माहिती उपयुक्त ठरते.

**मर्यादा :**

अभिरूची शोधिकांच्या मर्यादा

- शालेय विदयर्थ्यांच्या अभिरूची स्थिर झालेल्या नसतात. त्या स्थिर होण्य अगोदर त्यांचा शोध घेणे बरोबर नाही.
- कुमारवस्थेतील विदयार्थी जीवन व स्वत:च्या शोध घेत नसतात. त्यांना स्वत:ला काय पाहिजे याचीही जाणीव नसते.
- सुप्त अभिरूची कृतीत उतरविण्यासाठी अनुकूल परिस्थिती वा वातावरण असणे आवश्यक असते असे अनुकूल वातावरण सर्वांनाच लाभते असे नाही.
- विविध व्यवसायात अनेक समान कृती असतात. त्यामुळे विशिष्ट अभिरूचींच्या आधारावर विशिष्ट व्यवसाय निवडणे अयोग्य ठरण्याचा संभव असतो. दुनाखे अ.,१९९९,६०)

**अभिरूचीचे शैक्षणिक महत्व :**

अध्ययन अध्यापन प्रक्रिया यशस्वी व्हावयाची असेल तर विदयार्थ्यांचे अवधान असणे आवश्यक आहे. अवधान असण्यासाठी आणि ते टिकून राहण्यासाठी अभिरूची असणे आवश्यक आहे. अभिरूचीचे संपादन करता येते. म्हणून शिक्षकाने विदयार्थ्यामध्ये विषयाविषयी अभ्यासाविषयी अभिरूची निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी

१. **यशाचा अनुभव :** विदयार्थ्याला विषयात यशाचा अनुभव आला तर अधिक काम करण्याची प्रेरणा मिळते. त्यातूनच त्या विषयात अभिरूची निर्माण होते.

२. **विदयार्थ्याच्या गरजा :** त्याच्या विकासावस्थेची वैशिष्टये यांचा विचार अभ्यासक्रम, अध्यापन अनुभूती, अभ्यासपूरक कार्यक्रमांचे नियोजन करताना करावा.

३. **अध्यापन सूत्रांचा :** उपयोग अध्यापनात करावा जसे सोप्याकडून अवघडांकडे, साध्याकडून संकीर्णाकडे, ज्ञाताकडून अज्ञाताकडे त्यामुळे आकलनास मदत होते. अभिरूची वाढते.

४. **नावीन्यपूर्ण शैक्षणिक साधनांचा उपयोग करावा :** त्यामुळे अवधान आकर्षिले जाऊन आकलनास मदत होते. विषयात अभिरूची निर्माण होते.

५. **शिक्षकाचा दृष्टीकोन :** अध्यापन विषयासंबंधी शिक्षकाचा दृष्टीकोन सकारात्मक असेल तर विदयार्थ्यांना विषयामध्ये अभिरूची निर्माण होते. कारण ज्या विषयासंबंधी सकारात्मक दृष्टीकोन असतो तो विषय शिक्षक अधिक उत्साहाने अभ्यासपूर्ण सखोल शिकवितात. त्यामुळे विदयार्थ्यांनाही अध्ययनात उत्साह आणि आनंद वाटतो. याउलट शिक्षक जर त्रासिक चेहयाने कंटाळवाणेपणाने अध्यापन करत असतील शिक्षकालाच विषयाच्या अध्यापनात अभिरूची नसेल तर विदयार्थ्यांची विषयातील अभिरूची कमी होते. अध्यापनातून योग्य प्रेरणा मिळेल असे प्रयत्न शिक्षकाने करावे.

**अवधान आणि अभिरूची :**

अभिरूची म्हणजे आवड. ज्या गोष्टीबद्दल आपल्या मनात आवड असते ती गोष्ट करताना आपणास सुखद अनुभव येतो. जी गोष्ट आपणास आवडते ती गोष्ट मनापासून करतो, तसेच अवधानपूर्वक करतो.

अभिरूची असणारा विषय अध्ययनार्थ्याचे अवधान खेचून घेतो. त्या विषयात त्याचे अवधान टिकून राहते. अभिरूची आणि आवड अवधानातून प्रत्ययास येते. अवधानातून अभिरूची व्यक्त होते. आपल्या मनात अभिरूची असेल तर त्या विषयाकडे आपले अवधान वळते. या अर्थाने अभिरूची ही अवधानाची जननी होय. तसेच अभिरूची हे अवधानाचे सुप्त रूप होय.

"Interest is latent attention and attention is interest in action." (करंदीकर सु. २००९,२२९)

अवधान व अभिरूची या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. असे असले तरी अध्ययनाच्या संदर्भात त्यांचा आपण स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे. अवधान आणि अभिरूची हे अध्ययनावर परिणाम करणारे महत्वाचे घटक आहे.

अभ्यासावर लक्ष केंद्रित करायचे म्हणजे काय तर जाणिवेचा ओघ एका विशिष्ट ठिकाणी केद्रिंत करायचा असतो. अवधान हे जाणिवेचे केंद्र होय. अवधान म्हणजे एखादया गोष्टीकडे किंवा विषयाकडे वळलेला आपल्या मनाचा ओघ होय.

अभिरूची हा मनाचा स्थायीभाव आहे. अभिरूची जन्मजात आणि संपादित दोन्ही प्रकारची असते. उदा.- एखादया मुलाला इतिहासात अभिरूची नाही पण त्याला ऐतिहासिक घटना रंजकपणे सांगितल्या त्यातील घटना आणि परिणामक्रम स्पष्ट केला.

इतिहासातील व्यक्तिंची चरित्रे वाचावयास दिली तर या सर्वांचा परिणाम म्हणून इतिहास विषयात त्याला यश मिळू लागेल. इतिहासाचा अधिक अभ्यास करण्याची प्रेरणा मिळेल आणि हळूहळू इतिहास या विषयात अभिरूची निर्माण होईल. म्हणजेच अभिरूची संपादित करता येईल.

**१ अवधान आणि अभिरूची यांचा संबंध :**

अवधान आणि अभिरूची यांचा संबंध अतिशय घनिष्ठ आहे. एखादया विषयात अभिरूची असेल तर अवधान आपोआप खेचले जाते. गणितात अभिरूची असलेल्या मुलाला तू गणिताचा अभ्यास कर असे सांगावे लागत नाही. चित्रकलेत अभिरूची असणाया व्यक्तिला गावात सुरु असलेले चित्रप्रदर्शन बघायला जा असे सांगावे लागत नाही. म्हणजेच अभिरूची असेल तर त्या गोष्टीकडे अवधान सहज खेचले जाते. त्या विषयात अवधान वाढते. विषय समजायला लागला की, हळूहळू अभिरूची विकसित होत जाते. म्हणजेच अभिरूची असेल तर अवधान दिले जाईल आणि अवधान दिले तर अभिरूची वाढत जाईल. (गाजरे रा.वि.,चिटणीस अ.,२००६,१७६)

विदयार्थ्यांचा स्तर लक्षात घेऊन अवधान कसे खेचता येईल व केंद्रित करता येईल याचा शिक्षकाने विचार केला पाहिजे. अनेक बाहय घटक : उद्दीपकाची तीव्रता, नावीन्य, आकर्षकता,आकार,हालचाल, आवृत्ती, विरोध, महत्व, इत्यादी आणि प्रेरणा, अभिरूची, आत्मीयता, वृत्ती इत्यादी यांचा योग्य वापर करून अवधान खेचून घेता येईल. परिस्थितीनुसार ते ऐच्छिक,अनैच्छिक वा इच्छाशक्ति प्रेरित असेल. शक्यतो ऐच्छिक अवधानाचा आश्रय घेतल्यास अडचणी येत नाहीत.

अभिरूची घेतलेल्या कार्यात यश मिळाले तर सुख होते व अपयश आले की दु:ख होते. यास्तव आक्षेपकांनी आणि अध्यापकांनी अभिरूची या शब्दांच्या शिक्षण प्रक्रियेतील धारणेची नीट छाननी करावी आणि संकुचित अर्थाचा योग्य तो विस्तार करावा. रूची म्हणजे क्रियात्मक स्थिरभाव होय. ती सहजप्रवृत्तीतून स्थिरभावनेतून व 'स्व' च्या संपूर्ण संघटनेतून निर्माण झालेली असते. अनैच्छिक अवधानात रूचिव्दारे कोणत्याही सुखदु:खाचा अनुभव न येता केवळ अस्मितेचा प्रमुख स्थिरभावास अनुसरून येणारी हितबुध्दी म्हणजेच रूचिस्वरूपहोय.

स्थिरभाव रूची आणि अनैच्छिक उत्स्फूर्त अवधान यांचा बौध्दिक शिक्षणात अतिशय महत्वाच उपयोग आहे. प्रारंभी अंतदृष्टीचा अध्यापक विदयार्थ्यांतील स्थिरभावाचा उपयोग करून छंदांना जागवील. या छंदाच्या स्थिरभावाभोवती चार्तुर्याने अनेक भावनांची गुंफण घालील. अभिरूची व अवधान विषयाकडे आणण्याची मनाची रचना निर्माण करणे त्यातच रस घेणे हेच त्याचे कार्य राहील. (आळंदकर ज.ज्ञा.,१९६७,१३२)

**अभिरूची चाचण्यांचा वापर करून केलेले संशोधन ः**

- Development of Nonverbal Interest Inventory based on Adaptation of certain aspects of Kuder preference Record.
- Construction and standardization of vocational Interest Inventory in Hindi for the secondary school pupils of Haryana.
- An Investigation into the Interest patterns of the students in science Humanities and

commerce streams at the Higher secondary Level.

- Construction and standardisation of a vocational interest Inventory for the secondary school pupils of kerala
- Construction and standardization of an interest Inventory for s.s.c Pupils of Gujarat state.

**समारोप :**

विदयार्थ्याच्या अभिरुचीनुसार शिक्षण दिले गेले तर विदयार्थ्याचा विकास योग्य मार्गाने होवून त्यांच्यातील आत्मविश्वास वाढेल. वेगवेगळया क्षेत्रात विदयार्थी प्रावीण्य मिळवतील. विदयार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासाबरोबर देशाचा आर्थिक, सामाजिक विकास ही होईल. वेगवेगळया अभिरूचीच्या चाचण्यांचा उपयोग करून विदयार्थ्याचे मापन केले असता विदयार्थ्याची आवड कोणत्या क्षेत्रात आहे.

हे लक्षात घेवून विदयार्थ्याना योग्य मार्गदर्शन देता येईल.देशातील शिक्षणप्रकिया विदयार्थ्याच्या अभिरूचीनुसार चालणारी असेल तर विदयार्थ्या बरोबर देशाचा विकास ही निश्चितच होईल.

**संदर्भ सूची :**


- फाटक मा.१९९९,शिक्षणातील परीक्षण आणि मापन ,पुणे,नूतन प्रकाशन.
- गाजरे रा.वि.,चिटणीस अ.,२००६, अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र आणि मानसशास्त्रीय प्रयोग,

पुणे,नित्य नूतन प्रकाशन.

- गुळवणी मे.,२००९,मार्गदर्शन व समुपदेशन ,पुणे,नित्य नूतन प्रकाशन .
- करंदीकर सु.,२००९,अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र,कोल्हापूर,फडके प्रकाशन .
- काळे प्रे.,१९९०,मानसशास्त्रीय मापन ,मुंबई मनोविकास प्रकाशन .

◦ http://Internet Test.classifiedads.com

◦ http:// Ask.com/Interest Test

पस्तावना

आजची शिक्षण पद्धती ही विदयार्थी केंद्रित आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात विदयार्थ्या समोर व्यवसाय निवडीचे ,वेगवेगळया क्षेत्रात शिक्षण घेण्याचे क्षेत्र विस्तारलेले आहे. वैज्ञानिक शोधांचा परिणाम म्हणून,आपल्या गरजांच्या प्ररणेतून विविध प्रकारचे व्यवसाय अस्तित्वात आले आहेत.

पदार्थ विज्ञान ,रसायनशास्त्र,जीवशास्त्र, यांच्या विविध उपशाखां बरोबर जैवतंत्रज्ञान ,संगणक शास्त्र, नॅनो टेक्नॉलॉजी ,वैदयकशास्त्र,अवकाशशास्त्र यामध्ये क्रांतिकारक शोध लागत आहेत व त्यातून विदयार्थ्यांसाठी शिक्षणाची नवीन दालने खुली होत आहेत. कला शाखेतून नेहमीची सामाजिक शास्त्रे यांबरोबर देशी व परदेशी भाषांची मागणी वाढत आहे. ॲनिमेशनचे नवे तंत्रज्ञान एका नव्याच क्षेत्राची संधी उपलब्ध करुन देत आहे. अवकाशातील अभ्यासक्रमाचे क्षेत्र विस्तारत आहे. सध्याचे विदयार्थी या अर्थाने सुदैवी आहेत की ,त्यांच्या समोर शिक्षणासाठी , व्यवसायासाठी

विविध मार्ग उपलब्ध आहेत. पण हीच गोष्ट निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्यांना गोंधळात टाकणारी आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी व विदयार्थ्यांच्या शिक्षणाला, योग्य व्यवसाय निवडीच्या क्षेत्राला निश्चित दिशा देण्यासाठी उपलब्ध आहेत अभिरूची शोधिका.

**रूचि -परीक्षण कसोटयांचा विकास**

## (Development of Interest Tests In India And Abroad)

सर्व प्रथम अमेरिकेत व्यावसायिक आणि शैक्षणिक मार्गदर्शन करण्याच्या गरजेतून रूचिपरीक्षणाचा जन्म झाला. त्यामुळे शिक्षण, उदयोगधंदे यातून रूचिपरिक्षण हे आवश्यक प्रेरक असे मानसशास्त्रीय परीक्षण समजले जाऊ लागले. तिच्या मापनाचे वस्तुनिष्ठ आणि व्यक्तिनिष्ठ असे दोन प्रकार पडतात. रूचि-परीक्षणामुळे व्यक्तिला कोणत्या कामात रस आहे हे कळते व ते काम शिक्षण त्याला देता येते. त्यामुळे काम अधिक मन:पूर्वक केले जाते. कामाचा दर्जा सुधारतो. या दृष्टीकोनातून रूचि-परीक्षणाचा जाणीवपूर्वक विकास केला गेला. म्हणून रूचि मापनाचा इतिहास फार जुना नाही. व्यावसायिक क्षेत्रात आणि शैक्षणिक क्षेत्रात योग्य व्यक्तिंची निवड करण्यासाठी रूचिपरिक्षण कसोटी सर्वप्रथम १९१४ मध्ये "कार्नेजी इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी" इथे तयार केली गेली. या क्षेत्रात पध्दतशीर अभ्यास सुरू करण्याचे श्रेय 'व्यावसायिक प्रवृत्ती सूची' तयार करणा-या मायनर १९१८ याला जाते. तिच्याव्दारे व्यक्तिची विशिष्ट रूची आणि पात्रता निश्चित करणे सोपे झाले. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात अशा परीक्षण कसोटयांचा व्यापक प्रमाणात उपयोग होऊ लागला त्यानंतर मात्र विविध क्षेत्रांसाठी व्यक्तिचे रूचि मापन करणाया विविध कसोटया तयार होऊ लागल्या. त्यात दहा - बारा प्रश्नांपासून २००-२०० प्रश्नसंख्या असलेल्या कसोटया होत्या. हर्बाट, व्हेलर, प्रिस्ले, कूडर, ली थॉर्प, गिलफर्ड, स्नाईडमन, झिमरमन, थर्स्टन इ. चा अनेक विषयांसाठी तयार केलेल्या रूचि-परीक्षण कसोटया प्रसिध्द आहेत.

भारतीय रूचि मापन परीक्षण क्षेत्रात मुख्यत: पाश्चात कसोटयांचे भारतीय वातावरण व गरजांनुसार अनुकूलनाचे कार्य जास्त प्रमाणात झाले. यातील काही अनुकूलन कार्यपुढीलप्रमाणे आहेत.

- **आलाहाबाद ब्युरो ऑफ व्होकेशनल अँड एज्युकेशनल गाईडन्स :** १९५६ कूडर इन्व्हेंटरीचे अनुकूलन. यात ८० प्रश्न असून प्रत्येक प्रश्नासमोर १,२,0 असे आकडे असतात. सगळयात जास्त आवडीच्या प्रश्नासमोर २ वर खूण केली जाईल तर नावडीच्या प्रश्नासमोर 0 वर

खूण केली जाईल.

- **एस.चटर्जी (१९६०) :** एक मान्य इन्व्हेंटरी भारतीय वातावरणाला अनुरूप अशी दहा विविध क्षेत्रांसाठी तयार केलेल्या इन्हेंटरीज तयार केल्या.
- **एस.बी.लाल भारव्दाज (१९६०) :** व्यावसायिक शिक्षणासाठी परीक्षण कसोटया तयार केल्या.
- **रामशकल पाण्डेय (१९६५) :** कुमारवयीन मुलांच्या रूचि-परीक्षणासाठी कसोटया तयार केल्या.
- **रघुराज पाल सिंह (१९६७) :** यंत्रज्ञान, व्यापार, विज्ञान, सौंदर्य, सामाजिकता कारकून इ.च्या रूचि मापनासाठी
- **मीरा जोशी, जगदीश पाण्डे :** व्यावसायिक, प्राथमिकता, रूचि मापन तसेच साहित्य, विज्ञान, सर्ज नशीलता, सौंदर्य, शेतकी , समाजसेवा इ. अनेक क्षेत्रांतील रूचि-मापनासाठी अनेक परीक्षण कसोटया तयार झाल्या आहेत. (फाटक मा. १९९९,१३४)

**अभिरूची व्याख्या :**

- अवधान म्हणजे अभिरूचीच्या वोधनात्मक प्रक्रियेची निश्चिती. Bingham W.V. (गुळवणी मे.,२००९,१४५)

" एखादया अनुभवात स्वत:ला गुंतवून ठेवण्याची तो अनुभव दीर्घकाळ ठेवण्याची प्रवृत्ती अभिरूची होय." - विंगॅम डव्यू.व्ही. (गुळवणी मे.,२००९,१४५)

" अभिरूची ही भिन्न मानसशास्त्रीय वाव नसून वर्तनाच्या अनेक अंगापैकी एक अंग आहे. - सुपर डी.ई. (गुळवणी मे.,२००९,१४६)

" विशिष्ट वस्तू वा प्रसंगाच्या वावतीत प्रत्यक्ष किंवा काल्पनिक प्रतिक्रियांशी संवंध आवडण्याची भावना म्हणजे अभिरूची होय." - जोन्स (गुळवणी मे.,२००९,१४६)

"अभिरूची म्हणजे सुप्त अवधान आणि अवधान म्हणजे व्यक्त अभिरूची." - मॅक्डुगल (गाजरे रा.वि.,चिटणीस अ.२००६,१७७)

**अभिरूचीची वैशिष्टये -**

- अभिरूचीचा विकास परिस्थिती व अनुवंश यांच्या सहयोगातून येतो. परंतु अभिरूची मुख्यत्वे संपादित केल्या जातात.
- अभिरूचीमुळे कृती करण्यास प्रेरणा मिळते.
- अभिरूची हया व्यक्तिमत्वाचाच एक भाग असतो
- अभिरूचीमुळे कोणतेही काम किंवा कृतीचे ओझे वाटत नाही.
- अभिवृत्ती खूपशा स्थिर असतात. सहजासहजी त्यात वदल करता येत नाही.
- सर्वसाधारणपणे अभिरूची व क्षमता यांचा सहयोग आढळतो. (गुळवणी मे.,२००९,१४६)

**रूचीचे प्रकार :**

रूचीचे प्रकट दर्शन कशाकशातून होते . यावरून रूचीचे चार प्रकार मानले जातात .

- **अभिव्यक्त रूची :**

  प्रश्नांमधून विचारांच्या अभिव्यक्तिमधून एखादी वस्तू क्रिया किंवा व्यक्ति यांच्याबद्दल प्रकट होणारी रूची ही अभिव्यक्त रूची असते .
- **प्रकट रूची :**

  एखादी कला, कौशल्याची बाब नवा विषय खेळ वगैरे शिकणे यातून त्या व्यक्तिला त्याबद्दल असलेल्या रूचीचे प्रकटीकरण होते .
- **परीक्षित रूची :**

  जेव्हा एखादया व्यक्तिल परीक्षेत एखादया विषयात इतर विषयांच्या तुलनेत खूप गुण मिळालेले दिसतात . तेव्हा त्या विषयात तिला जास्त रूची आहे . असे आपण समजतो .
- **सूची समूह शोध रूची :**

  जेव्हा प्रमाणित रूची कसोटयांव्दारे एखादयाच्या रूचीचे ज्ञान केले अथवा करवले जाते व व्यक्तिला मार्गदर्शन करण्यासाठी त्या सुचीचा उपयोग केला जातो . तेव्हा तिला सूची-समूह-

  शोध-रूची असे म्हणतात . (फाटक मा . १९९९,१३२)
- **रूचि - परीक्षणाचे प्रकार :**

  ही परीक्षणे सर्वसाधारपणे दोन प्रकारची असतात .

  - व्यावसायिक ( Vocational Interest Tests ) रूचि परिक्षणे
  - सर्वसाधारण, अव्यावसायिक (Non- Vocational Interest Tests or General Interest Tests )

  या व्यावसायिक क्षेत्रात अनेक त-हेने रूचींचे अस्तित्व आणि मापन करण्याची अनेक परीक्षणे तयार झाली आहेत व ती विश्वसनीय पण आहेत .

  सामान्य अव्यावसायिक परीक्षणांची संख्या भरपूर आहे . यांची रचना, सोपी, सुस्पष्ट असते . पडताळा सूची प्रश्नावली लेखन इ . त-हेचे प्रश्न पण यात असतात . प्रत्येक ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीला अनुलक्षून अशा प्रश्नमालिका यात तयार केलेल्या असतात . मार्गदर्शन आणि सल्ला यांसाठी ही परीक्षणे उपयुक्त ठरतात .

**प्रमुख परदेशी आणि भारतीय रूचि-परीक्षणे :**

| **परदेशी रूचि परीक्षण** | **भारतीय रूचि परीक्षण** |
|---|---|
| • स्ट्राँगची व्यावसायिक रूचि (Strong's Vocational Interest Inventory ) | • एस . चटर्जी अभाषिक प्राथमिकता प्रपत्र ( CNPR – FORM 962 ) |
| • कूडर रूचि प्राथमिकता पडताळा | • आर . पी . सिंग रूचि प्रपत्र |

- थर्स्टनची रूचि पडताळा सूची
- एस.पी.कुलश्रेष्ठ व्यावसायिक रूचि -परीक्षण
- एस.पी.कुलश्रेष्ठ शैक्षणिक रूचि -परीक्षण
- डी.एस.सोढी आणि भटनागर रूचि -परीक्षण
- एम.एन.पलसाने आणि साधना शर्मा स्वयं अध्ययन सवय परीक्षण

(फाटक मा., १९९९, १३६)

**रूची मापन :**

रूची म्हणजे एखादया विषयात असलेला रस या कल्पनेची इच्छा,अभिवृत्ती, अभिक्षमता इ.गोष्टींशी तुलना करता त्यात खूप अंतर आहे फरक आहे असे आपणास आढळून येईल.

**१. रूची आणि भावना :**

यातील फरक पहिला तर रूचीत फक्त सुख आनंदाची अनुभूती येते तर भावनेत या व्यतिरिक्त इतर सर्व भावनांची म्हणजे दु:ख, क्रोध, उद्वेग इ.वेगवेगळया प्रसंगाने अनुभूती येत असते.

**२. रूची आणि इच्छा :**

रूची म्हणजे एखादया अनुभवानंतर तो आनंदकारक वाटून त्यात रस वाटू लागतो.ही क्रिया सकारात्मक असते पण वस्तूच्या अभावातून इच्छा जागृत होते व ती वस्तू अनुभव मिळवण्याचा प्रयत्न सुरू होतो.

**३. रूची आणि अभिवृत्ती :**

सर्वसाधारणपणे या दोन्हीत खूप जवळचा संबंध असतो.तरीपण काही वेळा त्यांच्यात परस्परविरोध असतो.अभिवृत्तीत धनात्मक आणि ऋणात्मक दोन्ही विचारांना महत्त्व असते तर रूचीत फक्त धनात्मक विचारच असतात.तसेच संपूर्ण जीवनभराच्या अनुभवातून अभिवृत्तीही निर्माण होत असते.तर रूचीचा संबंध शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रांशी व त्यांच्या निवडीशी असतो.

**४. रूची आणि अभिक्षमता :**

रूची आणि अभिक्षमता या दोघांचा एकमेकांशी अतिशय घनिष्ट सहसंबंध आहे आणि एकमेकींच्या विकासाला त्या साहयभूत होत असतात.

सूपर (Super) च्या विचारानुसार जेव्हा जन्मजात अभिक्षमता आणि सामाजिक सोयी सुविधा यांच्यात देवाणघेवाण सुरू होते, तेव्हाच रूची जागृत होते.म्हणून रूची विकासासाठी अभिक्षमतेची आवश्यकता आहे याउलट एखादया विषयात रूची विकासासाठी अभिक्षमतेची आवश्यकता आहे.याउलट एखादया विषयात रूची नसेल तर त्याबाबतच्या व्यवसायाची आपण कल्पना पण करू शकत नाही.म्हणूनच एखादयाची अभिक्षमता (Attitude) ठरवण्यासाठी त्याची रूची, कल कशात आहे हे पाहावे लागते. व्यक्तिच्या ठिकाणी या दोन्ही गोष्टी असतील तर ती त्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करेल, मनापासून शिकेल.

**५. रूची आणि क्षमता :**

या दोन्ही गुणांतही एक विशिष्ट संबंध दिसून येतो. एखादी विशिष्ट गोष्ट शिकण्यासाठी व्यक्तित त्या गोष्टीबद्दल आवड आणि ती शिकण्याची क्षमता दोन्ही असावे लागते. केवळ एकाच गोष्टीच्या असण्याने अध्ययनाला मदत होत नाही. चित्रे काढण्याची आवड आहे पण ती क्षमता नसेल तर व्यक्ती उत्तम चित्रकार बनू शकणार नाही. हीच गोष्ट इतर बाबतीतही लागू आहे.

**६. रूचीचा उद्‌गम -**

रूची म्हणजे आवडीचा उद्‌गम कशातून होतो. तिचे मूळ नेमके कशात आहे. हे सांगणे कठीण आहे. तिच्या निर्मितीत परिस्थिती आणि संशय दोन्ही घटक कारणीभूत असतात. तसेच सुखसोयी आणि सामाजिक मूल्यमापन हे पण तिच्या विकासात कारणीभूत ठरत असते. प्रथम अभिक्षमता आणि रूची म्हणून केलेल्य एखादया गोष्टीचा समाजात उद्रेक झाला की ती रूची आणखी झपाटयाने वाढीस लागते.

जसे चित्रकारी कौशल्यपूर्ण वा वेगळया वस्तू बनविणे, निर्मिती इ. म्हणून रूचीचा उद्‌गम आणि वाढ ही अभिक्षमते बरोबरच सामाजिक मान्यतेवर अवलंबून असते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. म्हणून ती काही प्रमाणात संपादित पण असते असे ही म्हणता येते. तसेच इच्छा, अभाव, आदर्श वातावरण, संस्कृती, सोयी, अनुभव रूचीच्या विकासात जसे सहायक ठरतात. परिवर्तन, प्रोत्साहन,यश हे पण साहयभूत ठरत असतात. रूचीत अभिक्षमताही बीजरूपात असतेच, तिचेच एक विधायक विशाल स्वरूप आहे. वय आणि लिंग भेदानुसारही रूचीचे स्वरूप वेगवेगळे असते. (फाटक मा. १९९९,१३२)

**अभिरूची मापन साधने :**

अभिरूची मापन करण्यासाठी निरीक्षण मुलाखत, पडताळासूची, प्रश्नावली,
शोधिका अशा अनेक पध्दतींचा व साधनांचा वापर केला जातो. प्रमुख शोधिका पुढीलप्रमाणे आहेत.

- स्ट्रॉंगची व्यावसायिक अभिरूची नमुनापत्रिका ह्यफेरम्ह
- कुडरच्या प्राधान्य क्रम नोंदी
- क्लिटनची व्यावसायिक अभिरूची शोधिका

**अभिरूची मापनाची आवश्यकता :**

- व्यक्तिच्या सुप्त आवडीनिवडी उजेडात येतात.
- प्रत्यक्ष कृतीवरून अभिरूचीची पातळी व प्रमाण समजते.
- अभिरूची व क्षमता आणि अभिरूची व प्राविण्य यांची तुलना करता येते.
- मार्गदर्शकास विदयार्थ्याबाबत व विदयार्थ्यास स्वत:बाबत अभिरूचीचे ज्ञान होते.
- अभिरूचीनुसार व्यवसाय निवड करण्यास सहकार्य करता येते.
- योग्य कर्मचायांची निवड करण्यास उपयुक्त ठरते.

- व्यवसाय मार्गदर्शनासाठी उपयुक्त ठरते.
- व्यक्तिची अभिरूची तात्पुरती की खरी हे समजते. (गुळवणी मे.,२००९,१४६)

**अभिरूची मापनाच्या मर्यादा :**

- शालेय विदयार्थ्यांच्या अभिरूची स्थिर झालेल्या नसतात.त्या स्थिर होण्यापूर्वी त्यांचा शोध घेणे योग्य ठरत नाही.
- सुप्त अभिरूची कृतीत उतरविण्यासाठी अनुकूल परिस्थिती व वातावरण यांची आवश्यकता असते.असे वातावरण सर्वांनाच मिळते असे नाही.
- विविध व्यवसायात अनेक कृती असतात.त्यामुळे विशिष्ट अभिरूचीच्या आधारावर विशिष्ट व्यवसाय निवडणे योग्य ठरेलच असे नाही.
- कुमारावस्थेतील विदयार्थी स्वत:चा व जीवनाचा शोध घेत असतो.त्यांना स्वत:ला काय आवडते, काय पाहिजे याची जाणीव नसते. (गुळवणी मे.,२००९,१४६)

**अभिरूची शोधिका :**

व्यक्तिच्या जीवनात त्यांच्या अभिरूचींना आवडी निवडींना महत्वाचे स्थान असते. ज्या कामाची, छंदाची वा व्यवसायाची व्यक्तिस आवड असते ते काम, छंद वा व्यवसाय व्यक्ती मनापासून करते व त्यात स्वत:ला झोकुन देते.अभिरूची आणि प्रेरणा यांचा अगदी जवळचा संबंध असतो.व्यक्तिच्या व्यवसाय निवडीत अभिरूचीचा मोठा वाटा असतो. म्हणून मार्गदर्शक समुपदेशकास विदयार्थ्यांच्या अभिरूचींची माहिती असणे आवश्यक असते.ही माहिती वस्तुनिष्ठ रितीने मिळविण्याचे साधन म्हणजे प्रमाणित अभिरूची शोधिका होय.

**अभिरूची शोधिका - उपयुक्तता :**

अभिरूची शोधिका मार्गदर्शन व समुपदेशन कार्यात पुढील कारणांमुळे उपयुक्त असतात.

- व्यक्तिने दावा केलेली तात्पुरती अभिरूची काढणे.
- व्यक्तिच्या सुप्त आवडीनिवडी उजेडात येतात.
- प्रत्यक्ष कृतीवरून अभिरूचीची पातळी वा प्रमाण कळून येते.
- अभिरूची व क्षमता आणि अभिरूची व प्राविण्य यांची तुलना करता येते.
- अभिरूचीनुसार व्यवसायाची निवड करण्यास मदत होते
- मार्गदर्शकास विदयार्थ्याविषयी व विदयार्थ्यास स्वत: विषयी माहिती कळते.
- नोकरदात्यास योग्य कर्मचारी निवडण्यास ही माहीती उपयुक्त ठरते.
- व्यवसाय मार्गदर्शनाच्या कामी विदयार्थ्यांच्या अभिरूचींची माहिती उपयुक्त ठरते.

**मर्यादा :**

अभिरूची शोधिकांच्या मर्यादा

- शालेय विदयर्थ्यांच्या अभिरूची स्थिर झालेल्या नसतात . त्या स्थिर होण्य अगोदर त्यांचा शोध घेणे बरोबर नाही .
- कुमारवस्थेतील विदयार्थी जीवन व स्वत:च्या शोध घेत नसतात . त्यांना स्वत:ला काय पाहिजे याचीही जाणीव  नसते .
- सुप्त अभिरूची कृतीत उतरविण्यासाठी अनुकूल परिस्थिती वा वातावरण असणे आवश्यक असते असे अनुकूल वातावरण सर्वांनाच लाभते असे नाही .
- विविध व्यवसायात अनेक समान कृती असतात . त्यामुळे विशिष्ट अभिरूचींच्या आधारावर विशिष्ट व्यवसाय निवडणे अयोग्य ठरण्याचा संभव असतो . दुनाखे अ .,१९९९,६०)

**अभिरूचीचे शैक्षणिक महत्व :**

अध्ययन अध्यापन प्रक्रिया यशस्वी व्हावयाची असेल तर विदयार्थ्यांचे अवधान असणे आवश्यक आहे . अवधान असण्यासाठी आणि ते टिकून राहण्यासाठी अभिरूची असणे आवश्यक आहे . अभिरूचीचे संपादन करता येते . म्हणून शिक्षकाने विदयार्थ्यांमध्ये विषयाविषयी अभ्यासाविषयी अभिरूची निर्माण करण्याचा प्रयत्न करावा . त्यासाठी

१ . **यशाचा अनुभव :** विदयार्थ्याला विषयात यशाचा अनुभव आला तर अधिक काम करण्याची प्रेरणा मिळते . त्यातूनच त्या विषयात अभिरूची निर्माण होते .

२ . **विदयार्थ्यांच्या गरजा** : त्याच्या विकासावस्थेची वैशिष्टये यांचा विचार अभ्यासक्रम, अध्यापन अनुभूती, अभ्यासपूरक कार्यक्रमांचे नियोजन करताना करावा .

३ . **अध्यापन सूत्रांचा :** उपयोग अध्यापनात करावा जसे सोप्याकडून अवघडांकडे, साध्याकडून संकीर्णाकडे, ज्ञाताकडून अज्ञाताकडे त्यामुळे आकलनास मदत होते . अभिरूची वाढते .

४ . **नावीन्यपूर्ण शैक्षणिक साधनांचा उपयोग करावा :** त्यामुळे अवधान आकर्षिले जाऊन आकलनास मदत होते . विषयात अभिरूची निर्माण होते .

५ . **शिक्षकाचा दृष्टीकोन :** अध्यापन विषयासंबंधी शिक्षकाचा दृष्टीकोन सकारात्मक असेल तर विदयार्थ्यांना विषयामध्ये अभिरूची निर्माण होते . कारण ज्या विषयासंबंधी सकारात्मक दृष्टीकोन असतो तो विषय शिक्षक अधिक उत्साहाने अभ्यासपूर्ण सखोल शिकवितात . त्यामुळे विदयार्थ्यांनाही अध्ययनात उत्साह आणि आनंद वाटतो . याउलट शिक्षक जर त्रासिक चेहयाने कंटाळवाणेपणाने अध्यापन करत असतील शिक्षकालाच विषयाच्या अध्यापनात अभिरूची नसेल तर विदयार्थ्यांची विषयातील अभिरूची कमी होते . अध्यापनातून योग्य प्रेरणा मिळेल असे प्रयत्न शिक्षकाने करावे .

**अवधान आणि अभिरूची :**

अभिरूची म्हणजे आवड.ज्या गोष्टीबद्दल आपल्या मनात आवड असते ती गोष्ट करताना आपणास सुखद अनुभव येतो.जी गोष्ट आपणास आवडते ती गोष्ट मनापासून करतो, तसेच अवधानपूर्वक करतो.

अभिरूची असणारा विषय अध्ययनार्थ्याचे अवधान खेचून घेतो. त्या विषयात त्याचे अवधान टिकून राहते.अभिरूची आणि आवड अवधानातून प्रत्ययास येते.अवधानातून अभिरूची व्यक्त होते.आपल्या मनात अभिरूची असेल तर त्या विषयाकडे आपले अवधान वळते.या अर्थाने अभिरूची ही अवधानाची जननी होय.तसेच अभिरूची हे अवधानाचे सुप्त रूप होय.

"Interest is latent attention and attention is interest in action." (करंदीकर सु.२००९,२२९)

अवधान व अभिरूची या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.असे असले तरी अध्ययनाच्या संदर्भात त्यांचा आपण स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे.अवधान आणि अभिरूची हे अध्ययनावर परिणाम करणारे महत्वाचे घटक आहे.

अभ्यासावर लक्ष केंद्रित करायचे म्हणजे काय तर जाणिवेचा ओघ एका विशिष्ट ठिकाणी केद्रिंत करायचा असतो.अवधान हे जाणिवेचे केंद्र होय.अवधान म्हणजे एखादया गोष्टीकडे किंवा विषयाकडे वळलेला आपल्या मनाचा ओघ होय.

अभिरूची हा मनाचा स्थायीभाव आहे.अभिरूची जन्मजात आणि संपादित दोन्ही प्रकारची असते.उदा.- एखादया मुलाला इतिहासात अभिरूची नाही पण त्याला ऐतिहासिक घटना रंजकपणे सांगितल्या त्यातील घटना आणि परिणामक्रम स्पष्ट केला.

इतिहासातील व्यक्तिंची चरित्रे वाचावयास दिली तर या सर्वांचा परिणाम म्हणून इतिहास विषयात त्याला यश मिळू लागेल. इतिहासाचा अधिक अभ्यास करण्याची प्रेरणा मिळेल आणि हळूहळू इतिहास या विषयात अभिरूची निर्माण होईल.म्हणजेच अभिरूची संपादित करता येईल.

**१ अवधान आणि अभिरूची यांचा संबंध :**

अवधान आणि अभिरूची यांचा संबंध अतिशय घनिष्ठ आहे.एखादया विषयात अभिरूची असेल तर अवधान आपोआप खेचले जाते.गणितात अभिरूची असलेल्या मुलाला तू गणिताचा अभ्यास कर असे सांगावे लागत नाही. चित्रकलेत अभिरूची असणाया व्यक्तिला गावात सुरू असलेले चित्रप्रदर्शन बघायला जा असे सांगावे लागत नाही.म्हणजेच अभिरूची असेल तर त्या गोष्टीकडे अवधान सहज खेचले जाते.त्या विषयात अवधान वाढते.विषय समजायला लागला की, हळूहळू अभिरूची विकसित होत जाते.म्हणजेच अभिरूची असेल तर अवधान दिले जाईल आणि अवधान दिले तर अभिरूची वाढत जाईल. (गाजरे रा.वि.,चिटणीस अ.,२००६,१७६)

विदयार्थ्यांचा स्तर लक्षात घेऊन अवधान कसे खेचता येईल व केंद्रित करता येईल याचा शिक्षकाने विचार केला पाहिजे.अनेक वाहय घटक : उद्दीपकाची तीव्रता, नावीन्य, आकर्षकता,आकार,हालचाल, आवृत्ती, विरोध, महत्व, इत्यादी आणि प्रेरणा, अभिरूची, आत्मीयता, वृत्ती इत्यादी यांचा योग्य वापर करून अवधान खेचून घेता येईल. परिस्थितीनुसार ते ऐच्छिक,अनैच्छिक वा इच्छाशक्ति प्रेरित असेल.शक्यतो ऐच्छिक अवधानाचा आश्रय घेतल्यास अडचणी येत नाहीत.

अभिरूची घेतलेल्या कार्यात यश मिळाले तर सुख होते व अपयश आले की दु:ख होते.यास्तव आक्षेपकांनी आणि अध्यापकांनी अभिरूची या शब्दांच्या शिक्षण प्रक्रियेतील धारणेची नीट छाननी करावी आणि संकुचित अर्थाचा योग्य तो विस्तार करावा.रूची म्हणजे क्रियात्मक स्थिरभाव होय.ती सहजप्रवृत्तीतून स्थिरभावनेतून व 'स्व' च्या संपूर्ण संघटनेतून निर्माण झालेली असते.अनैच्छिक अवधानात रूचिव्दारे कोणत्याही सुखदु:खाचा अनुभव न येता केवळ अस्मितेचा प्रमुख स्थिरभावास अनुसरून येणारी हितबुध्दी म्हणजेच रूचिस्वरूपहोय.

स्थिरभाव रूची आणि अनैच्छिक उत्स्फूर्त अवधान यांचा बौध्दिक शिक्षणात अतिशय महत्वाच उपयोग आहे. प्रारंभी अंतदृष्टीचा अध्यापक विदयार्थ्यातील स्थिरभावाचा उपयोग करून छंदांना जागवील.या छंदाच्या स्थिरभावाभोवती चार्तुर्याने अनेक भावनांची गुंफण

घालील.अभिरूची व अवधान विषयाकडे आणण्याची मनाची रचना निर्माण करणे त्यातच रस घेणे हेच त्याचे कार्य राहील. (आळंदकर ज.ज्ञा.,१९६७,१३२)

**अभिरूची चाचण्यांचा वापर करून केलेले संशोधन ः**

- Development of Nonverbal Interest Inventory based on Adaptation of certain aspects of Kuder preference Record.
- Construction and standardization of vocational Interest Inventory in Hindi for the secondary school pupils of Haryana.
- An Investigation into the Interest patterns of the students in science Humanities and commerce streams at the Higher secondary Level.
- Construction and standardisation of a vocational interest Inventory for the secondary school pupils of kerala
- Construction and standardization of an interest Inventory for s.s.c Pupils of Gujarat state.

**समारोप ः**

विदयार्थ्याच्या अभिरुचीनुसार शिक्षण दिले गेले तर विदयार्थ्याचा विकास योग्य मार्गाने होवून त्यांच्यातील आत्मविश्वास वाढेल. वेगवेगळया क्षेत्रात विदयार्थी प्रावीण्य मिळवतील. विदयार्थ्याच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबर देशाचा आर्थिक, सामाजिक विकास ही होईल. वेगवेगळया अभिरूचीच्या चाचण्यांचा उपयोग करून विदयार्थ्याचे मापन केले असता विदयार्थ्याची आवड कोणत्या क्षेत्रात आहे.

हे लक्षात घेवून विदयार्थ्याना योग्य मार्गदर्शन देता येईल.देशातील शिक्षणप्रकिया विदयार्थ्याच्या अभिरूचीनुसार चालणारी असेल तर विदयार्थ्या बरोबर देशाचा विकास ही निश्चितच होईल.

**संदर्भ सूची :**


- फाटक मा.१९९९,शिक्षणातील परीक्षण आणि मापन ,पुणे,नूतन प्रकाशन.
- गाजरे रा.वि.,चिटणीस अ.,२००६, अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र आणि मानसशास्त्रीय प्रयोग,

पुणे,नित्य नूतन प्रकाशन.

- गुळवणी मे .,२००९,मार्गदर्शन व समुपदेशन ,पुणे,नित्य नूतन प्रकाशन .
- करंदीकर सु .,२००९,अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र,कोल्हापूर,फडके प्रकाशन .
- काळे प्रे .,१९९०,मानसशास्त्रीय मापन ,मुंबई मनोविकास प्रकाशन .
- http://Internet Test.classifiedads.com
- http:// Ask.com/Interest Test


SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES • 2012 • SRJIS